सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक : क्रमांक १०/ एडीएम / पदविका प्रवेश / मदतकक्ष केंद्र / २२८ दिनांक : 11 JUN 2025

प्रति,
प्राचार्य,
दहावीनंतरचे पदविका अभ्यासक्रमांच्या सुविधा केंद्र नसणाऱ्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील दहावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेमध्ये मदतकक्ष स्थापन करणेबाबत**

उपरोक्त विषयाबाबत नमूद करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदविका स्तरावरील अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने आवश्यक ती गोपनीयता राखून, उचित रितीने, विद्यार्थी व पालक यांचे हित विचारात घेता प्रचार, प्रसार व जागरुकता निर्माण करुन राबविण्याबाबत शासनाचे निर्देश वेळोवेळी प्राप्त होत असतात. सर्व तंत्रनिकेतनामध्ये १०० टक्के प्रवेश होण्याचे अनुषंगाने सर्व स्टेकहोल्डर्सने प्रयत्न करणे देखील तितकेच गरजेचे आहे. संचालनालयाद्वारे करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाचा सकारात्मक परिणाम प्रवेश प्रक्रियेवर होत असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एकूण प्रवेशक्षमतेच्या ९० टक्के प्रवेश झालेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम वर्ष पोस्ट एसएससी (दहावीनंतरचे) पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. विद्यार्थ्यांसाठी या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय कार्यालयांच्या शिफ़ारशीनुसार संचालनालयाने अर्ज भरणे व निश्चिती करणे या प्रक्रियेसाठी यापुर्वीच निवडक संस्थांची सुविधा केंद्र म्हणुन घोषणा केलेली आहे. या सुविधा केंद्राद्वारे अर्ज निश्चितीची प्रक्रिया सुरु आहे. तसेच शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेद्वारे ई-स्क्रुटिनी पद्धतीने अर्ज निश्चितीची प्रक्रिया देखील सुरु आहे. ई-स्क्रुटिनी पद्धतीने प्राप्त अर्ज देखील तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश बैठकीमध्ये संबधिताना देण्यात येत असतात.

राज्यात दहावी नंतरच्या प्रथम वर्षाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या ४०० पेक्षा जास्त संस्था आहेत. त्यापैकी ३३० संस्थांना सुविधा केंद्र म्हणुन घोषित करण्यात आले आहे. दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने त्याच्या निवासाजवळच्या कोणत्याही तंत्रनिकेतनामध्ये संपर्क साधल्यास त्याला पदविका अभ्यासक्रमाची, प्रवेशप्रक्रियेची माहिती मिळणे आवश्यक आहे. केवळ संस्थेला सुविधा केंद्र घोषित केले नसल्याने त्याला तेथुन परत जाणे अथवा मदत न मिळणे हे उचीत ठरत नाही. संस्थेत होणारे प्रवेश वाढविण्याची संस्थेचे प्राचार्य म्हणुन आपली देखील जवाबदारी आहे. सबब ज्या संस्थाना सुविधा केंद्र घोषित केले नाही अशा सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या प्राचार्याना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यापासुन ते संपेपर्यंत त्यांच्या संस्थेच्या परिसरात दर्शनी भागात प्रवेश प्रक्रियेसाठी मदतकक्ष स्थापन करावे. मदतकक्षातील सर्व संबधितांनी प्रवेश प्रक्रियेच्या सर्व नियमांचे अवलोकन करावे. मदतकक्षामध्ये संस्थेतील कमीत कमी दोन वरिष्ठ अध्यापकांची नेमणुक करावी, जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या सर्व शंकाचे निरसन करणे शक्य होईल. मदत कक्षातर्फे संपुर्ण प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी तसेच त्यांना अर्ज सादर करण्याबाबत जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधण्यास सांगावे व त्यांच्या माहितीचे समाधान होईल याबाबत काळजी घ्यावी. मदतकक्षावर आपण देखील वैयक्तिकरित्या देखरेख ठेवावी. अर्ज निश्चितीची प्रक्रिया ही नियमानुसार घोषित सुविधाकेंद्राद्वारेच होईल, याची नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छ. संभाजीनगर, मुंबई, नागपुर, नाशिक व पुणे — त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संबधित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थाना निदर्शनास आणुन द्यावे. ज्या संस्था सुविधा केंद्र म्हणुन घोषित करण्यात आलेल्या नाहीत अशा संस्थामध्ये मदतकक्ष स्थापन होईल याची दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी संचालनालयास सादर करावा.

२) प्रणाली व्यवस्थापक, मुख्य कार्यालय यांना माहिती व कार्यवाहीसाठी

*******